दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 शनिवार, दि. २१ फेब्रुवारी, २०२६ वर्ष - १ अंक - १४९ पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प,
वैवस्वत मन्वंतरयुगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसु नाम संवत्सर, उत्तरायण
वसंतऋतु, फाल्गुनमास, शुक्लपक्ष, चतुर्थी दुपारी ३-०२ पर्यंत.
नक्षत्र- रेवती संध्याकाळी ७-०७ पर्यंत.
योग- शुभ दुपारी ३-५२ पर्यंत

### सहकारी बँकेला गंडा

**पुणे** : शहरातील एका बहुराज्य सहकारी बँकेच्या दोन शाखांमध्ये तब्बल ९१ लाख रुपयांच्या बनावट सोनेतारण कर्ज घोटाळ्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ४१ कर्ज प्रकरणांत तारण ठेवलेले सोने फेरतपासणीत पूर्णपणे खोटे असल्याचे निष्पन्न झाल्याने बँक प्रशासनात खळबळ उडाली आहे.या प्रकरणी संबंधित कर्जदार आणि तत्कालीन गोल्ड व्हॅल्युएटर अजित प्रभाकर कुलकर्णी यांच्याविरुद्ध फसवणुकीची तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## सारांश वृत्त

### जम्मू-काश्मीरचा फळ उद्योग वाचवा

**श्रीनगर :** भारत-अमेरिका अंतरिम व्यापार कराराचा देशातील शेतकरी आणि फळ उत्पादकांवर परिणाम होईल यावर भर देऊन, पीडीपीच्या प्रमुख मेहबूबा मुफ्ती यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कराराचा पुनर्विचार करण्याचे आणि जम्मू आणि काश्मीरच्या फलोत्पादन उद्योगाचे संरक्षण करण्यासाठी सफरचंदांवर ५० टक्के आयात शुल्क लागू करण्याचे आवाहन केले. शेतकऱ्यांना काही सुरक्षा उपाय होते, आता ते संरक्षण गेले आहे. याचा परिणाम देशभरातील शेतकऱ्यांवर होईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

### रस्ते अपघातात विद्यार्थ्याचा मृत्यू

**देवरिया (उत्तर प्रदेश) :** उत्तर प्रदेशातील देवरिया जिल्ह्यात शुक्रवारी सकाळी एका भरधाव एसयूव्हीने मोटारसायकलला धडक दिल्याने बारावीच्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गौरी बाजार पोलिस हद्दीतील बखरा खास येथील पलिया टोला येथील रहिवासी आर्यन कुमार निषाद (१७) हा नॅशनल इंटर कॉलेजचा विद्यार्थी होता.

### पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचे उल्लंघन

**श्रीनगर :** पाकिस्तानने शुक्रवारी जम्मू आणि काश्मीरच्या कुपवाडा जिल्ह्यात नियंत्रण रेषेवर (एलओसी) शस्त्रसंधीचे उल्लंघन केले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. "उत्तर काश्मीरमधील कुपवाडा येथील नौगाम सेक्टरमधील टीएमजी (तूट मार गली) येथे दुपारी शस्त्रसंधीचे उल्लंघन झाले जेव्हा पीओकेच्या चौक्यांनी भारतीय चौक्यांवर लहान शस्त्रांनी गोळीबार केला," असे अधिकाऱ्यांनी सांगितले. काही वेळाने गोळीबार थांबला, असे त्यांनी पुढे सांगितले, परंतु यात कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नाही.

### १७ फेब्रुवारी रोजीच्या शासन निर्णया विरोधात याचिका दाखल

# मुस्लिम आरक्षण विरोधी निर्णयाला आव्हान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : मुस्लिम समुदायासाठी शैक्षणिक संस्थांमध्ये आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये देण्यात आलेले पाच टक्के आरक्षण रद्द करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयामुळे कायदेशीर आणि राजकीय वादाला तोंड फुटले आहे. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सरकारने काढलेल्या शासन निर्णयाला आता मुंबई उच्च न्यायालय येथे आव्हान देण्यात आले आहे.

दिवाणी रिट याचिका (क्रमांक ५०६३/२०२६) ॲड. डॉ. एजाज अब्बास नक्वी यांनी दाखल केली असून, वकील नितीन सातपुते यांच्यामार्फत युक्तिवाद मांडला जात आहे. १७ फेब्रुवारीच्या जीआर १८१ ला असंवैधानिक आणि सांप्रदायिकदृष्ट्या प्रेरित ठरवत तो तात्काळ रद्द करावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

याचिकाकर्त्यांचा दावा आहे की, हा निर्णय लोकशाही मूल्यांच्या विरोधात असून एका मोठ्या समुदायाला विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर लोटणारा आहे. २०१४ मध्ये तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस सरकारने "विशेष मागासवर्ग" या श्रेणीत मराठा समाजाला १६ टक्के आणि मुस्लिम समुदायाला ५ टक्के आरक्षण देण्याचा अध्यादेश काढला होता. त्यानंतर न्यायालयीन प्रक्रियेत मराठा आरक्षण रद्द झाले, मात्र शैक्षणिक क्षेत्रातील मुस्लिम आरक्षणाला अंशतः दिलासा मिळाला होता. सध्याच्या महायुती सरकारच्या नव्या निर्णयामुळे तो दिलासा संपुष्टात येत असल्याचा युक्तिवाद करण्यात आला आहे.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता ही याचिका २३ फेब्रुवारी २०२६ रोजी न्यायमूर्ती रियाझ छागला यांच्या खंडपीठासमोर तातडीने सुनावणीसाठी सूचीबद्ध होण्याची शक्यता आहे.

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी सरकारवर टीका करत भाजप सरकार मुस्लिम समाजाविरोधात काम करत असल्याचा आरोप केला. कायदा प्रत्यक्षात अस्तित्वात नसताना तो रद्द केल्याचे सांगून समाजाची दिशाभूल केली जात असल्याचा दावा त्यांनी केला. आता या नव्या निर्णयामुळे आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्यातील राजकारण पुन्हा तापण्याची चिन्हे दिसत आहेत. उच्च न्यायालयाच्या सुनावणीनंतर पुढील कायदेशीर दिशा स्पष्ट होणार आहे.

#### काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारचा निर्णय

● २०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीनंतर तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी राज्य सरकारने महाराष्ट्रात मराठा आणि मुस्लिम आरक्षणासंदर्भात निर्णय घेतला होता. त्या वेळी सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मराठ्यांना १६ टक्के आणि मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण जाहीर करण्यात आले होते. त्यामुळे राज्यातील एकूण आरक्षणाचा आकडा ७३ टक्क्यांवर गेला होता. त्या काळात अल्पसंख्याक कल्याण मंत्री नसीम खान यांनी मंत्रिमंडळात मुस्लिम आरक्षणाचा प्रस्ताव मांडला होता आणि तो एकमताने मंजूर झाला होता.

## भारतात एअरबसची भरारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : जागतिक एव्हिएशन क्षेत्रातील आघाडीची कंपनी एअरबसला भारतात नवी प्रोडक्शन लाईन मिळाल्यानंतर मोठी भरारी घेण्याची संधी मिळाली आहे. देशांतर्गत हवाई संपर्क क्षेत्रात पुढील काही वर्षांत एक हजाराहून अधिक हेलिकॉप्टरची मागणी निर्माण होऊ शकते, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. नागरी वापरासोबतच लष्करी दलांकडूनही मोठ्या प्रमाणात मागणी येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.


माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत एअरबस हेलिकॉप्टरचे मुख्य कार्यकारी अधिकारी ब्रुनो इवेन यांनी सांगितले की, भारतातील नव्या असेंबली लाईनमधून पहिले हेलिकॉप्टर २०२७ च्या सुरुवातीला तयार होऊन बाहेर पडण्याची शक्यता आहे. एअरबस भारतीय कंपनी टाटा ॲडव्हान्स सिस्टिम्स लिमिटेडच्या सहकार्याने भारतात हेलिकॉप्टर निर्मिती करत आहे.

ब्रुनो इवेन यांनी स्पष्ट केले की कंपनीचे लक्ष्य नागरी तसेच लष्करी बाजारपेठ आहे. लष्करी मोहिमांसाठी एच १२५ हेलिकॉप्टरमध्ये वाढता रस दिसत आहे. जर ग्राहकांनी या हेलिकॉप्टरची निवड केली, तर ते भारतात तयार करण्यास कोणतीही अडचण नाही, असे त्यांनी नमूद केले. यामुळे भविष्यात भारतातून लष्करी हेलिकॉप्टरची निर्यात होण्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे. बंगळुरूमधील नव्या उत्पादन सुविधेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्रपती इमॅन्युअल मॅक्रोन यांच्या हस्ते मुंबईतून व्हर्च्युअल पद्धतीने करण्यात आले. या असेंबली लाईनसाठी एअरबसने सुमारे १००० कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे.

या प्रकल्पामुळे देशातील एव्हिएशन उत्पादन क्षेत्राला चालना मिळण्याबरोबरच रोजगारनिर्मितीलाही गती मिळणार आहे. हेलिकॉप्टर सेवेला महत्त्व प्राप्त होत असताना एअरबसची ही गुंतवणूक रणनीतिकदृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे.

## परळी येथील तहसीलदार लाच प्रकरणात ताब्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**परळी** : परळी येथील तहसीलदार व्यंकटेश मुंडे हे लाचलुचपत प्रकरणात अडकल्याची घटना समोर आली आहे. सालन्सी प्रमाणपत्र देण्यासाठी त्यांनी तक्रारदाराकडे पन्नास हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे.

तडजोडीअंती वीस हजार रुपये देण्याचे ठरल्याची माहिती समोर आली आहे. मात्र संबंधित तक्रारदाराने थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. त्यानंतर एसीबीच्या पथकाने सापळा रचून कारवाईची तयारी केली. तक्रारदाराने ठरल्याप्रमाणे रक्कम देण्याचा प्रयत्न केला असता, आपल्या हालचालींवर संशय आल्याने तहसीलदार मुंडे यांनी पैसे स्वीकारण्यास टाळाटाळ केल्याचे सांगितले जाते. तथापि, एसीबीने या प्रकरणात आवश्यक पुरावे संकलित केल्याचा दावा केला आहे. चौकशीनंतर व्यंकटेश मुंडे याला ताब्यात घेण्यात आले.

या कारवाईमुळे महसूल प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. गेल्या काही दिवसांत एसीबीकडून विविध विभागांवर छापे टाकले जात असल्याने अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सरकारी कार्यालयांमध्ये सर्वसामान्य नागरिकांचे काम करण्यासाठी पैशांची मागणी होत असल्याची तक्रार कायम असल्याचे चित्र आहे.

### राज्यसभेच्या एका जागेसाठी मविआत रस्सीखेच

# अजितदादांनंतर शरद पवारांची पहिली निवडणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : महाराष्ट्रातील सात राज्यसभा जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर मविआ अंतर्गत हालचालींना वेग आला आहे. एकच जागा महाविकास आघाडीच्या वाट्याला येण्याची शक्यता असल्याने कोणत्या पक्षाचा उमेदवार द्यायचा, यावरून आघाडीत चुरस निर्माण झाली आहे. अजितदादांनंतर शरद पवारांची ही पहिली निवडणूक असून, पवारांना राज्यसभा मिळणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

निवडणूक आयोगाने देशातील १० राज्यांमधील ३७ रिक्त जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. यात महाराष्ट्रातील सात जागांचा समावेश आहे. महाराष्ट्रासह ओडिशा, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, बिहार, छत्तीसगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांमध्येही मतदान होणार आहे. १६ मार्च रोजी मतदान होणार असून २ एप्रिल रोजी विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ संपणार आहे.

महाराष्ट्रातील ज्यांचा कार्यकाळ संपत आहे, त्यामध्ये शरद पवार, डॉ. भागवत कराड, डॉ. फौजिया खान, प्रियंका चतुर्वेदी, धैर्यशील पाटील, रजनी पाटील आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा समावेश आहे. विधानसभेतील सध्याचे संख्याबळ पाहता महायुतीकडे स्पष्ट बहुमत आहे. भाजपचे १३२, शिवसेना ५७, राष्ट्रवादी काँग्रेस ४१, उबाठा गट २०, काँग्रेस १६ आणि शरद पवार गटाचे १० आमदार आहेत. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीला केवळ एकच उमेदवार निवडून आणण्याइतपत संख्याबळ एकत्र करता येणार असल्याचे चित्र आहे.

याच एका जागेसाठी आघाडीत मतभेद उघड होत आहेत. उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी शरद पवार राज्यसभेवर जाण्याची इच्छा व्यक्त केल्याचे सांगितले. आघाडी म्हणून एकत्र बसून निर्णय घेतला जाईल, तसेच राज्यसभा आणि विधानपरिषद या दोन्ही निवडणुकांचा एकत्रित विचार होईल, असे त्यांनी नमूद केले. मात्र, उबाठा गटाकडून वेगळी भूमिका पुढे आली आहे. आदित्य ठाकरे यांनी ही जागा उबाठाची असल्याचा दावा केला आहे.

दरम्यान, काँग्रेसची भूमिका देखील निर्णायक ठरणार आहे. प्राथमिक चर्चांमध्ये शरद पवार यांच्या उमेदवारीबाबत काहींनी नाराजी व्यक्त केल्याची चर्चा आहे. 'जागा एक, दावेदार अनेक' अशी परिस्थिती आहे.

आता अंतिम निर्णय काय होतो, शरद पवार पुन्हा निवडणूक लढवतात का, आणि आघाडीतील तिन्ही पक्ष एकदिलाने उभे राहतात का, याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. राज्यसभेच्या या निवडणुकीतून महाविकास आघाडीची पुढील राजकीय दिशा ठरण्याची चिन्हे आहेत.

# ईडीचे पश्चिम बंगाल सरकारवर गंभीर आरोप

### राज्य पोलिसांनी हस्तक्षेप करून संवैधानिक मर्यादा ओलांडली...

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : अंमलबजावणी संचालनालयाने पश्चिम बंगाल सरकार आणि राज्याचे पोलीस महासंचालक यांच्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात गंभीर आरोप केले आहेत. केंद्रीय तपासात राज्य पोलिसांनी हस्तक्षेप करून संवैधानिक मर्यादा ओलांडल्याचा दावा ईडीने केला आहे.

ईडीच्या निवेदनानुसार, हे प्रकरण निवडणूक रणनीती संस्था आय-पॅकशी संबंधित असून त्या अनुषंगाने छापे टाकताना पश्चिम बंगाल पोलिसांनी अडथळा आणला. आय-पॅकच्या कार्यालयासह संबंधित व्यक्तींच्या ठिकाणी कायदेशीर कारवाई सुरू असताना पोलिसांनी हस्तक्षेप केल्याचा आरोप करण्यात आला आहे. एजन्सीने न्यायालयात सांगितले की तपासासाठी आवश्यक असलेली काही डिजिटल उपकरणे आणि महत्त्वाची कागदपत्रे पोलिसांच्या उपस्थितीत हटवण्यात आली. त्यामुळे पुराव्यांशी छेडछाड झाल्याचा संशय असून तपास प्रक्रियेला धक्का बसल्याचे ईडीचे म्हणणे आहे.

मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या सूचनांनुसारच पोलीस अधिकाऱ्यांनी काम केले, असा थेट आरोप ईडीने केला आहे. डीजीपीसारख्या संवैधानिक पदावरील अधिकाऱ्याने निष्पक्ष आणि कायद्याच्या चौकटीत राहून वागणे अपेक्षित असताना या प्रकरणात शिष्टाचार आणि कायद्याचे उल्लंघन झाल्याचे एजन्सीने नमूद केले. बंगाल सरकारने सुरक्षेच्या कारणास्तव उपकरणे हटवण्यात आल्याचा दावा केला असला तरी तो खोटा असल्याचे ईडीने स्पष्ट केले. सुरक्षेचा मुद्दा पुढे करून प्रत्यक्षात तपासातील पुरावे हटवण्यात आल्याचा आरोप एजन्सीने केला आहे. या पार्श्वभूमीवर ईडीने सर्वोच्च न्यायालयाकडे तपास केंद्रीय अन्वेषण ब्युरोकडे सोपवण्याची मागणी केली आहे. तसेच जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध एफआयआर दाखल करण्याचे निर्देश द्यावेत, अशी विनंतीही करण्यात आली आहे. राज्य पोलिसांनीच तपासात अडथळा आणल्यास निष्पक्ष चौकशी शक्य नाही, असे ईडीचे म्हणणे आहे.

दरम्यान, हे प्रकरण यापूर्वीही सर्वोच्च न्यायालय आणि कलकत्ता उच्च न्यायालयात उपस्थित झाले होते. सध्या सर्वोच्च न्यायालयात याची सुनावणी सुरू असून पुढील तारखेला यावर सविस्तर चर्चा होणार आहे.

### मुंबई-गोवा मार्गावर टँकरमधून गॅस गळती

**रत्नागिरी** : मुंबई-गोवा महामार्गावर गुरुवारी मध्यरात्री सीएनजी गॅसची गळती झाल्याची थरारक घटना घडली. रत्नागिरी जिल्ह्यातील सावर्डे नजीक दहिवली फाट्याजवळ गॅस वाहतूक करणाऱ्या टँकरमधून मोठ्या प्रमाणावर गळती सुरू झाली. मात्र टँकर चालकाने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे दुर्घटना टळली. सीएनजी गॅस घेऊन जाणारा टँकर महामार्गावरून जात असताना अचानक गळती सुरू झाली. दहिवली फाट्याजवळ पोहोचताच चालकाच्या ही बाब लक्षात आली. टँकरमधून वेगाने गॅस बाहेर पडत असल्याचे दिसताच चालकाने तातडीने वाहन रस्त्याच्या कडेला सुरक्षित ठिकाणी उभे केले आणि खाली उतरून सुरक्षित अंतरावर गेला.

# एकल मातांना पालक म्हणून मान्यता

### औरंगाबाद खंडपीठाचा ऐतिहासिक निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**छत्रपती संभाजीनगर** : एकल मातांना "पूर्ण पालक" म्हणून मान्यता देणे ही दया नसून संविधानिक अधिकार आहे, असे स्पष्ट निरीक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालय यांच्या औरंगाबाद खंडपीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. अल्पवयीन मुलीच्या शालेय नोंदीतून वडिलांचे नाव आणि त्यांची जात वगळण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

हे प्रकरण एका अल्पवयीन मुलीशी संबंधित आहे. संबंधित मुलीची प्रत्यक्ष देखभाल आईकडून होत असतानाही शालेय दाखल्यामध्ये वडिलांचे नाव आणि त्यांची जात "मराठा" अशी नोंद करण्यात आली होती. याविरोधात आईने न्यायालयात याचिका दाखल करून मुलीच्या शालेय नोंदीतून वडिलांचे नाव वगळण्याची आणि मुलीची जात आईच्या "महार" (अनुसूचित जाती) प्रमाणे दुरुस्त करण्याची मागणी केली होती. सुनावणीदरम्यान न्यायालयाने नमूद केले की, मुलाची ओळख केवळ पितृसत्तात्मक परंपरेवर आधारित असू शकत नाही. भारतीय संविधान समानता, सन्मान आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांना सर्वोच्च स्थान देते. त्यामुळे एकल मातेला पूर्ण पालकत्वाचा अधिकार नाकारणे हे संविधानाच्या मूलतत्त्वांविरोधात ठरेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले. निर्णय देताना न्यायालयाने ठामपणे म्हटले की, वंशपरंपरा किंवा जातीच्या चौकटीपेक्षा मुलाच्या सन्मानाचा, ओळखीचा आणि स्वातंत्र्याचा अधिकार अधिक महत्त्वाचा आहे. एकल मातांना पूर्ण पालकत्व देणे हे दान नसून त्यांचा मूलभूत अधिकार आहे, असा स्पष्ट संदेश या निकालातून देण्यात आला.

या प्रकरणात याचिकाकर्त्यांच्या वतीने बाजू मांडणाऱ्या ॲड. संघमित्रा वडमारे यांनी सांगितले की, संबंधित महिलेचा अर्ज प्रशासनाकडून नामंजूर करण्यात आला होता. त्यानंतर रिट याचिका दाखल करण्याचा सल्ला देण्यात आला. २ फेब्रुवारी रोजी औरंगाबाद खंडपीठाने दिलेला हा निर्णय एकल मातांच्या हक्कांच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरला आहे.

### बल्क डिलीटचा वापर करत विक्रीच्या नोंदी हटवल्या

# एक प्लेट बिर्याणी ते ७० हजार कोटींचा टॅक्स घोटाळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : तुमच्या जिभेवर रेंगाळणारी बिर्याणीची चव आणि एका प्लेटचं बिल इतकं मोठं प्रकरण उघड करेल, याची कल्पनाही कोणी केली नसेल. साध्या जेवणाच्या ऑर्डरपासून सुरू झालेला तपास आता देशातील मोठ्या टॅक्स चोरीच्या प्रकरणापर्यंत पोहोचला आहे. ग्राहकाला दिलेल्या बिलामागे प्रत्यक्ष विक्री लपवली जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

तपासात उघड झालेल्या प्राथमिक माहितीनुसार, २०१९-२० पासून आतापर्यंत सुमारे ७० हजार कोटी रुपयांची विक्री नोंदीतून गायब करण्यात आल्याचा अंदाज आहे. या प्रकारामुळे सरकारी महसुलाला मोठा फटका बसल्याची शक्यता वर्तवली जात आहे. तपास यंत्रणांच्या हाती तब्बल ६० टीबी इतका डिजिटल डेटा लागला आहे. या डेटामध्ये देशभरातील सुमारे १.७ लाख रेस्टॉरंट आयडींचा समावेश आहे.

हॉटेलमध्ये बिलिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या पॉइंट ऑफ सेल प्रणालीमध्ये 'बल्क डिलीट' नावाचे विशेष फीचर देण्यात आल्याचे समोर आले आहे. या सुविधेद्वारे ३० दिवसांपर्यंतच्या विक्रीच्या नोंदी एका क्लिकवर हटवता येत असल्याचे आढळले. प्रत्यक्षात विक्री झाल्यानंतर ती लेखी नोंदीतून पुसली जात असल्याने उत्पन्न कमी दाखवले जाई आणि त्यानुसार करदेखील कमी भरला जाई.

या प्रकरणाचा उगम तेलंगणा राज्यातील हैदराबाद येथे झाल्याचे समोर आले आहे. हैदराबादमधील तीन लोकप्रिय बिर्याणी साखळ्यांवर आयकर विभागाने मोठी छापेमारी केली. नोव्हेंबर महिन्यात सुमारे ३० ठिकाणी कारवाई करण्यात आली. यात मुख्य कार्यालये आणि वरिष्ठ व्यवस्थापनाच्या निवासस्थानांचाही समावेश होता.

जप्त करण्यात आलेल्या डिजिटल नोंदी आणि यूपीआय व्यवहारांच्या पडताळणीतून मोठ्या प्रमाणावर विक्री लपवण्यात आल्याचे स्पष्ट झाले. केवळ आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या दोन राज्यांतच सुमारे ५ हजार कोटी रुपयांची विक्री नोंदीबाहेर ठेवल्याचा अंदाज आहे. काही प्रकरणांमध्ये एकाच पॅन क्रमांकाशी संबंधित एक कोटी रुपयांपेक्षा अधिकची विक्री लपवल्याचे पुरावे सापडले आहेत.

सध्या आयकर विभाग हटवलेल्या नोंदी पुनर्प्राप्त करण्याचे काम करत आहे. तपास पूर्ण झाल्यानंतर संबंधित हॉटेल मालकांवर मोठ्या प्रमाणात दंडात्मक कारवाई आणि फौजदारी गुन्हे दाखल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. देशभरातील रेस्टॉरंट उद्योगासाठी हा प्रकार मोठा धक्का मानला जात आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) टूल्स वापरून डिलीट केलेली बिले परत मिळवण्यात आली. तपासात असे दिसून आले की रेस्टॉरंट्सनी सहा वर्षांत अंदाजे २.४३ लाख कोटींची बिले तयार केली आहेत. यापैकी १३ हजार कोटींपेक्षा जास्त किमतीची बिले रेकॉर्ड केल्यानंतर डिलीट करण्यात आली. काही रेस्टॉरंट्स दररोज काही रोख बिले डिलीट करत असत, तर काहींनी एकाच वेळी संपूर्ण ३० दिवसांसाठी बिले डिलीट करत असत.

## भीमा पाटस कारखान्याच्या चौकशीचे दिले आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दौंड** : भाजपचे आमदार राहुल कुल अध्यक्ष असलेल्या भीमा पाटस सहकारी साखर कारखान्याच्या कारभाराची चौकशी करण्याचे आदेश पुणे प्रादेशिक साखर सहसंचालक नीलिमा गायकवाड यांनी दिले आहेत. माजी आमदार रमेश थोरात तसेच काही शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीनंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ८३(१) अन्वये ही चौकशी लावण्यात आली आहे.

सहकार मंत्र्यांकडे दाखल झालेल्या प्रकरणात कलम ८३(१) मधील तरतुदींची पूर्तता झाली आहे का, याची पडताळणी करण्यासाठी हे प्रकरण फेरनिर्णयार्थ साखर सहसंचालक कार्यालयाकडे पाठविण्यात आले होते. उभयपक्षी संयुक्त सुनावणीनंतर सहसंचालकांनी चौकशीचे आदेश जारी केले. राष्ट्रवादी काँग्रेस संबंधित माजी आमदार रमेश थोरात यांच्या तक्रारीवरून भाजपच्या आमदारांच्या कारखान्यावर चौकशी लागल्याने जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात चर्चा रंगली आहे. सहकार खाते राष्ट्रवादी काँग्रेसकडे असल्याच्या पार्श्वभूमीवर या कारवाईकडे राजकीय दृष्टिकोनातूनही पाहिले जात आहे.

कारखान्याच्या कारभारातील विविध १३ मुद्द्यांवर ही चौकशी होणार आहे. यासाठी सहकारी संस्थांचे विशेष लेखापरीक्षक वर्ग १ (साखर) द्वारकानाथ पवार यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# संपादकीय

## असमतोलाच्या छायेतली भागीदारी



**अमेरिका-भारत संबंधांविषयी विदेशी थेट गुंतवणुकीचे आकडे वेगळी कथा सांगतात. एकतर्फी भांडवली प्रवाह ही संरचनात्मक विषमता दर्शवतो, जी भविष्यातील राजकीय व आर्थिक संबंधांना नाजूक बनवू शकते आणि भागीदारीच्या टिकाऊपणावर प्रश्न उपस्थित करते.**

अमेरिका-भारत संबंधांचा उत्सव साजरा करणे सोपे आहे. जगातील सर्वात जुनी लोकशाही आणि सर्वात मोठी लोकशाही अशी प्रतिमा दोन्ही देशांच्या राजकीय संवादात वारंवार उमटते. संरक्षण सहकार्य, तंत्रज्ञानातील भागीदारी, ऊर्जा व्यवहार आणि स्थलांतरित भारतीयांचे सांस्कृतिक सेतू या सर्वांचा उल्लेख करून संबंधांच्या मजबुतीचे चित्र रंगवले जाते. परंतु अर्थकारण हे केवळ प्रतीकांवर चालत नाही; ते आकड्यांवर उभे असते. विदेशी थेट गुंतवणुकीच्या बाबतीत अमेरिका भारतात तिसऱ्या क्रमांकाचा स्रोत आहे. याचा अर्थ असा की अमेरिकन उद्योगविश्व भारताच्या वाढीवर आणि बाजारपेठेवर विश्वास ठेवते. उत्पादन, सेवा, तंत्रज्ञान आणि ऊर्जा या क्षेत्रांत अमेरिकन भांडवलाने आपली उपस्थिती दृढ केली आहे. हे स्वागतार्हच आहे. पण प्रश्न दुसऱ्या दिशेचा आहे. अमेरिकेत गुंतवणूक करणाऱ्या देशांच्या यादीत भारत अग्रक्रमावर नाही. शीर्ष वीस देशांमध्येही भारताचा उल्लेख होत नाही. ही केवळ संख्यात्मक तफावत नाही; ती धोरणात्मक असमतोलाची खूण आहे. या असमतोलाचे परिणाम सूक्ष्म असतात, पण दूरगामी ठरू शकतात. गुंतवणूक हा परस्परावलंबित्वाचा सर्वात ठोस आधार असतो. जेथे भांडवल, रोजगार आणि तंत्रज्ञान दोन्ही बाजूंनी गुंतलेले असते, तेथे राजकीय मतभेदांना मर्यादा येतात. उलट, एकतर्फी गुंतवणूक संबंध राजकीय दबावासाठी मोकळे मैदान तयार करतात. विशेषतः "अमेरिका प्रथम" अशा राजकीय वातावरणात, व्यापार आणि गुंतवणूक यांचा वापर धोरणात्मक हत्यार म्हणून केला जातो, हे नवे नाही. अलीकडील व्यापार चर्चांनंतर जाहीर झालेल्या चौकटीत भारताने पाच वर्षांत प्रचंड प्रमाणात अमेरिकन वस्तू खरेदी करण्याचे लक्ष्य स्वीकारल्याची घोषणा झाली. ऊर्जा, विमाने, मौल्यवान धातू, तंत्रज्ञान उत्पादने आणि कोळसा या सर्वांचा समावेश असलेली रक्कम भारताच्या वार्षिक अर्थसंकल्पाच्या जवळपास पोहोचणारी आहे. तांत्रिकदृष्ट्या ही खरेदी आहे; गुंतवणूक नव्हे. पण त्यामागील संदेश स्पष्ट आहे: व्यापारातील असमतोल दुरुस्त करण्यासाठी खरेदीची बांधिलकी वाढवली जाईल. याउलट, अमेरिकेत भारताचा परकीय थेट गुंतवणुकीचा साठा मर्यादित आहे. या तफावतीमुळे परस्परावलंबित्वाची सममिती निर्माण होत नाही. भू-राजकीय स्पर्धा तीव्र होत असताना आणि अंतर्गत राजकारण अधिक अनिश्चित होत असताना, अशी एकतर्फी रचना दीर्घकाळ टिकाऊ ठरू शकत नाही. भागीदारीची भाषा कितीही मैत्रीपूर्ण असली, तरी अर्थकारणातील असमतोल संबंधांना नाजूक बनवतो. याचा अर्थ असा नाही की नवी दिल्लीने राजकीय दबावाखाली उद्योगांना अमेरिकेत गुंतवणूक करण्याचे निर्देश द्यावेत. गुंतवणूक हा श्रद्धांजलीचा विषय नसतो; तो नफ्याचा, दीर्घकालीन धोरणाचा आणि जोखमीच्या मूल्यांकनाचा विषय असतो. कोणत्याही भारतीय उद्योगसमूहाने केवळ राजनैतिक समतोल राखण्यासाठी परदेशात भांडवल गुंतवणे ही दूरदृष्टी नव्हे. पण याउलट, अमेरिकन बाजारपेठेतील संधींचे शास्त्रीय परीक्षण करून, मूल्य निर्माण करणाऱ्या क्षेत्रांत पाय रोवणे ही गरज नक्कीच आहे. टाटा, रिलायन्स, अदानी आणि इतर उद्योगसमूहांनी जागतिक स्तरावर आपली क्षमता सिद्ध केली आहे. पोलाद, ऊर्जा, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान, औषधनिर्मिती या क्षेत्रांत भारतीय कंपन्या स्पर्धात्मक ठरल्या आहेत. अमेरिकन बाजारपेठ विशाल, गुंतागुंतीची आणि स्पर्धात्मक आहे; परंतु ती तितकीच नवकल्पनांसाठी खुलीही आहे. स्थानिक भागीदारी, संशोधन-विकास केंद्रे, हरित ऊर्जा आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रांत भारतीय गुंतवणुकीसाठी वाव आहे. यासाठी केवळ उद्योगांची तयारी पुरेशी नाही; धोरणात्मक पातळीवरही समन्वय आवश्यक आहे. गुंतवणूक करार, कर सवलती, तंत्रज्ञान हस्तांतरणाच्या अटी आणि बौद्धिक संपदा संरक्षण या सर्व बाबींचे सूक्ष्म व्यवस्थापन करावे लागते. आर्थिक राजनय हा केवळ व्यापार प्रतिनिधींच्या भेटींवर अवलंबून नसतो; तो दीर्घकालीन विश्वास आणि स्थिर धोरणांवर उभा असतो. अमेरिका-भारत संबंधांची खरी कसोटी घोषणांमध्ये नव्हे, तर परस्पर गुंतलेल्या हितसंबंधांत आहे. जर भारतीय भांडवल अमेरिकेत आणि अमेरिकन भांडवल भारतात समान आत्मविश्वासाने कार्यरत असेल, तर राजकीय वादळांचा परिणाम मर्यादित राहील. अन्यथा, संबंधांची मजबुती ही केवळ प्रतीकात्मक ठरेल. अर्थकारणात समतोल ही केवळ आकड्यांची जुळवाजुळव नसते; ती सामर्थ्यसंबंधांची पुनर्रचना असते. भारताने अमेरिकेसोबतची भागीदारी अधिक परिपक्व करायची असेल, तर गुंतवणुकीतील असमतोलाकडे डोळसपणे पाहणे आवश्यक आहे. विजयाच्या आख्यानापलीकडे जाऊन, परस्परावलंबित्वाची सममिती साधणे हीच दीर्घकालीन हिताची खरी हमी ठरेल.

# तापमानवाढीचा इशारा आणि धोरणांची उभारणी!

**» युरोपियन संघाच्या हवामान सल्लागार मंडळाने २१०० पर्यंत २.८ अंश सेल्सिअस तापमानवाढीची तयारी करण्याचा दिलेला इशारा ही निव्वळ वैज्ञानिक सूचना नाही; तर ती राजकीय आणि आर्थिक वास्तवाची जाणीव करून देणारी घंटा आहे. केवळ उत्सर्जनकपात पुरेशी ठरणार नाही, तर लवचिकतेची उभारणी अपरिहार्य ठरणार आहे.**



युरोपियन संघाच्या युरोपियन हवामान विषयक सल्लागार मंडळाने नुकत्याच दिलेल्या सूचनेत २१०० पर्यंत सुमारे २.८ अंश सेल्सिअस तापमानवाढीची शक्यता गृहीत धरून तयारी करण्याचे आवाहन केले आहे. ही वैज्ञानिक अंदाजपत्रकातील दुरुस्ती नाही; तर ती हवामान धोरणांच्या मूलभूत चौकटीवरच प्रश्नचिन्ह उभे करणारी भूमिका आहे. गेल्या काही दशकांपासून युरोपियन संघाची भूमिका स्पष्ट होती आणि ती म्हणजे हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करणे, ऊर्जा संक्रमणाला गती देणे आणि आंतरराष्ट्रीय करारांत पुढाकार घेणे. परंतु या नव्या सूचनेत एक मूक कबुली दडलेली आहे: पूर्व-औद्योगिक पातळीपेक्षा तापमानवाढ १.५ अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित ठेवण्याची पॅरिस ॲग्रिमेंट मधील महत्त्वाकांक्षा हळूहळू हाताबाहेर जात आहे. त्यामुळे केवळ शमन नव्हे, तर परिणामांना तोंड देण्याची संस्थात्मक तयारी अपरिहार्य ठरते. युरोप हा सर्वाधिक वेगाने तापमान वाढणारा खंड म्हणून अनेक अभ्यासांत नोंदला गेला आहे. दरवर्षी येणारे भीषण पूर, प्राणघातक उष्णतेच्या लाटा आणि नियंत्रणाबाहेर जाणाऱ्या जंगलातील आगी ही निसर्गाची केवळ इशारे नव्हेत; ते शासनव्यवस्थेच्या क्षमतेची कसोटी आहेत. जीवितहानी टाळणे, शेती व उद्योगांचे संरक्षण करणे आणि पायाभूत सुविधा सुरक्षित ठेवणे या तिन्ही आघाड्यांवर नव्या विचारांची गरज भासते. या संदर्भात भारतासारख्या देशांनाही समान आव्हानांचा सामना करावा लागत आहे. उष्णतेच्या लाटा, अवकाळी पाऊस, पूर आणि दुष्काळ यांची तीव्रता आणि अनिश्चितता वाढताना दिसते. हवामान बदल हा भौगोलिक सीमांचा विचार करत नाही; परंतु त्याचे परिणाम सामाजिक-आर्थिक रचनेनुसार भिन्न ठरतात. युरोपियन देशांकडे प्रभावी पूर्वसूचना प्रणाली, मजबूत सामाजिक सुरक्षा जाळे आणि तुलनेने कमी कृषी-आधारित अर्थव्यवस्था आहे. शेतीचा त्यांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा मर्यादित आहे आणि रोजगाराची रचना विविधीकृत आहे. त्यामुळे हवामान धक्क्यांचे तात्कालिक परिणाम कमी करण्याची त्यांची क्षमता तुलनेने अधिक आहे. भारतासारख्या विकसनशील देशांसमोर समीकरण वेगळे आहे. येथे शेती आणि असंघटित क्षेत्रातील रोजगार मोठ्या प्रमाणावर हवामानावर अवलंबून आहे. आर्थिक प्रगती, पायाभूत सुविधा उभारणी आणि सामाजिक सेवा विस्तार यांची तातडीही तितकीच महत्त्वाची आहे. धोरणकर्त्यांना एका बाजूला हवामान जोखमींचे व्यवस्थापन करावे लागते, तर दुसऱ्या बाजूला रोजगारनिर्मिती आणि विकासाचा पाया घालावा लागतो. तथापि, विकसनशील देशांसाठी एक संधीही येथे दडलेली आहे. युरोपातील महामार्ग, रेल्वेमार्ग, इमारती, जलपुरवठा आणि ऊर्जा व्यवस्था या बहुतांशी स्थिर हवामान गृहीत धरून उभारल्या गेल्या. आज त्या बदलत्या हवामानाच्या दडपणाखाली आहेत. भारतात मात्र पायाभूत सुविधांची उभारणी अजूनही सुरू आहे. म्हणजेच सुरुवातीलाच हवामान लवचिकतेचा विचार बांधकाम आराखड्यात समाविष्ट करण्याची संधी उपलब्ध आहे. याचा अर्थ विकास थांबवणे नव्हे, तर विकासाच्या संकल्पनेत हवामान वास्तव अंतर्भूत करणे. शहर नियोजन, जलव्यवस्थापन, शेती पद्धती, ऊर्जा उत्पादन आणि आपत्ती व्यवस्थापन या सर्व क्षेत्रांत दीर्घकालीन दृष्टिकोन आवश्यक आहे. केवळ आपत्ती निवारणावर खर्च वाढवणे हा उपाय नाही; तर आपत्ती टाळण्यासाठी आणि नुकसान मर्यादित ठेवण्यासाठी संरचनात्मक बदल गरजेचे आहेत. हवामान बदलाचा प्रश्न केवळ पर्यावरणीय नाही; तो आर्थिक शाश्वततेचा, सामाजिक न्यायाचा आणि राजकीय दूरदृष्टीचा आहे. तापमानवाढीच्या वाढत्या शक्यतेला मान्यता देणे ही पराभवाची नव्हे, तर वास्तवाची कबुली आहे. प्रश्न असा आहे की ही कबुली कृतीत कितपत रूपांतरित होते. युरोपियन संघाच्या सल्लागार मंडळाचा इशारा जगासाठी धोक्याची घंटा आहे. २.८ अंशांची शक्यता ही भीती पसरवणारी संख्या म्हणून नव्हे, तर धोरणात्मक पुनर्रचनेची संधी म्हणून पाहिली पाहिजे. हवामान बदल रोखण्याचा प्रयत्न सुरूच राहिला पाहिजे; पण त्याच वेळी अपरिहार्य परिणामांना सामोरे जाण्याची तयारीही तितकीच ठाम असली पाहिजे. विकास आणि लवचिकता यांचा मेळ घालणे हीच पुढील दशकांची खरी कसोटी ठरणार आहे.v

## शिवजयंती उत्साहात साजरी; महापौरांकडून अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पिंपरी-चिंचवड शहरातील विविध ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यांना पुष्पहार

पिंपरी, दि. १९ फेब्रुवारी २०२६ : पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती शहरात उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त शहरातील विविध चौक व सार्वजनिक ठिकाणी उभारलेल्या महाराजांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

महापौर रवि लांडगे यांनी पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील प्रतिमेस तसेच पीएमटी चौक भोसरी, लांडेवाडी चौक आणि हिंदुस्थान अँटीबायोटिक्स कॉलनी येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर स्वराज्य, न्याय, सुशासन आणि लोककल्याणाचे प्रतीक होते. सर्वधर्मसमभाव, स्त्रीसन्मान आणि शेतकरीहिताच्या मूल्यांची जोपासना करणे हीच खरी त्यांना आदरांजली असल्याचे त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी खासदार मेधा कुलकर्णी, माजी महापौर योगेश बहल, नगरसदस्य जितेंद्र ननावरे, वर्षा जगताप, माजी उपमहापौर महंमदभाई पानसरे यांच्यासह अनेक पदाधिकारी, अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

उपमहापौर शर्मिला बाबर यांनी भक्ती शक्ती समूह शिल्प उद्यान, प्रेमलोक पार्क चिंचवड, डांगे चौक थेरगाव, रहाटणी, पिंपरी वाघेरे, कासारवाडी, दापोडी व फुगेवाडी आदी ठिकाणी पुतळ्यांना अभिवादन केले. तसेच मोहननगर, चिंचवड व मोशी येथेही क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

शहरभर पार पडलेल्या या कार्यक्रमांमुळे शिवजयंतीचा उत्साह सर्वत्र पाहायला मिळाला.

## विवाहाच्या आमिषाने पुण्यात महिला फसवणुकीचा मोठा प्रकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुण्यात विवाहविषयक संकेतस्थळावर झालेल्या ऑनलाइन संवादादरम्यान एका ४४ वर्षीय महिलेला जवळपास ₹59,37,000 इतकी मोठी फसवणूक झाल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. या प्रकाराचा तपास चंदननगर पोलिस ठाण्यात सुरू असून सायबर गुन्हेगारी अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

महिलेने नोव्हेंबर २०२४ मध्ये एका प्रसिद्ध विवाह संकेतस्थळावर आपली ओळख नोंदवली होती. त्यानंतर तिने एका व्यक्तीशी ऑनलाइन संपर्क साधला ज्याने स्वतःला विवाहास इच्छुक असल्याचे सांगितले आणि विश्वास जिंकून घेतला. काही काळ नंतर, चोरट्याने विविध कारणे सांगत महिलेला पैसे मागण्यास सुरुवात केली. महिलेला खातरजमा न करता त्याच्या बँक खात्यात वेळोवेळी पैसे पाठवता आले आणि गेल्या दीड वर्षांत त्याच्या खात्यात तब्बल ₹59,37,000 जमा झाले आहेत. जितक्या पैशाची फसवणूक झाल्याचे लक्षात आले, त्यानंतर पीडितेने पोलिसांकडे तक्रार केली. पोलिस तपासात चोरट्याने मोबाइल क्रमांक बंद केला असून, तक्रारदार महिला त्याच्याशी संपर्क साधू शकत नाही, असे समोर आले आहे. या प्रकरणातील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदाळे करत आहेत.

सायबर क्राइमच्या या प्रकारांमध्ये फसवणूक करणारे ऑनलाइन प्रोफाइल तयार करून भावनिक नाते आणि विवाहाची आमिष दाखवून लोकांचा विश्वास जिंकतात, व नंतर विविध पैसे मागतात – ही धोरणे गुन्हेगारांच्या तंत्राचा एक भाग आहे.

## ऑनलाइन हॉटेल बुकिंगच्या नावाखाली महिलेची ७ लाखांची फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** ऑनलाइन हॉटेल बुकिंग करून देण्याचे आमिष दाखवत एका ५३ वर्षीय महिलेची तब्बल ७ लाखांहून अधिक रकमेची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याबाबतची सविस्तर बातमी लोकसत्तामध्ये प्रसिद्ध झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिलेला अज्ञात व्यक्तींनी हॉटेल बुकिंग सेवा देणाऱ्या कंपनीतून बोलत असल्याचे सांगून संपर्क साधला. विश्वास संपादन केल्यानंतर व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधत तांत्रिक माहिती घेतली. त्यानंतर सोशल इंजिनिअरिंगचा वापर करून तिचा मोबाईल क्रमांक आणि बँक खात्याशी संबंधित माहिती हस्तगत करण्यात आली. यानंतर काही वेळातच महिलेच्या बँक खात्यातून तब्बल ७ लाख २३ हजार रुपये काढण्यात आले. फसवणुकीची बाब लक्षात येताच महिलेने तातडीने शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली.

**सोशल इंजिनिअरिंगचा वाढता धोका**

सायबर गुन्हेगारांकडून नागरिकांना फसवण्यासाठी बनावट कस्टमर केअर नंबर, खोटे ॲप्स, व्हिडिओ कॉल आणि स्क्रीन शेअरिंगसारख्या तंत्रांचा वापर केला जात आहे. विशेषत: ऑनलाइन बुकिंग, गुंतवणूक किंवा बँकिंग सेवांच्या नावाखाली नागरिकांना लक्ष्य केले जात आहे.

## ‘शिवगर्जना’ महानाट्याचा दुसरा प्रयोग जल्लोषात

### युवकांना सामाजिक बांधिलकीची प्रेरणा देणारे सशक्त सादरीकरण – मनोज जरांगे पाटील

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकातर्फे आयोजित ‘विचार प्रबोधन पर्वा’अंतर्गत सादर करण्यात आलेल्या ‘शिवगर्जना’ या भव्य महानाट्याचा दुसरा प्रयोग बुधवारी निगडी येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रयोगाला थोर सामाजिक कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित राहून संपूर्ण महानाट्याचा आस्वाद घेतला.

यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ‘शिवगर्जना’ महानाट्याच्या माध्यमातून शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेमागील लोकाभिमुख दृष्टिकोन, न्यायनिष्ठ प्रशासन आणि सर्वसामान्यांसाठी केलेला संघर्ष प्रभावीपणे उलगडण्यात आला आहे. इतिहास केवळ स्मरणासाठी नसून, त्यातून प्रेरणा घेऊन आजच्या काळात सामाजिक बांधिलकी जपण्याची गरज आहे. युवकांनी राष्ट्राभिमानासोबत समाजहिताची जाणीव जोपासली, तर सकारात्मक परिवर्तन घडू शकते, असे त्यांनी प्रतिपादन केले.

निगडी येथील नियोजित महापौर निवास परिसरात पार पडलेल्या या महानाट्यात ऐतिहासिक घटनांवर आधारित प्रसंगांचे भव्य नेपथ्य, पारंपरिक वेशभूषा आणि आधुनिक तांत्रिक साधनांच्या सहाय्याने प्रभावी सादरीकरण करण्यात आले. स्वराज्य स्थापनेचा संघर्ष, किल्ल्यांच्या लढाया, आरमार उभारणी आणि शिवकालीन प्रशासनव्यवस्थेचे विविध पैलू नाट्यमय पद्धतीने साकारण्यात आले. कलाकारांच्या दमदार अभिनयामुळे उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. अनेक प्रसंगांना उत्स्फूर्त टाळ्यांचा कडकडाट मिळाला. कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे, उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसदस्य अमित गावडे, मारुती भापकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपआयुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महानाट्याच्या अनुषंगाने नागरिकांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि वाहतूक नियोजन करण्यात आले होते.

## इंद्रायणीसह पुणे जिल्ह्यातील ४२ ठिकाणी ‘स्वच्छ जल, स्वच्छ मन’ अभियान

# ‘प्रोजेक्ट अमृत’चा चौथा टप्पा सुरू!

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**आळंदी :** जलसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत संत निरंकारी मिशनतर्फे ‘प्रोजेक्ट अमृत’ अंतर्गत ‘स्वच्छ जल, स्वच्छ मन’ या अभियानाचा चौथा टप्पा रविवार, २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेत देशभर एकाच वेळी राबविण्यात येणार आहे. परम श्रद्धेय माता सुदीक्षा जी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम होणार आहे.

पुणे जिल्ह्यात इंद्रायणी नदी, मुळा नदी, मुठा नदी, भीमा नदी, पवना नदी यांसह विविध नद्या व तलाव अशा एकूण ४२ ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविली जाणार आहे. देहू–आळंदी–चऱ्होली परिसरात इंद्रायणी नदीकाठी विशेष स्वच्छता अभियान हाती घेतले जाणार आहे. मिशनचे सचिव जोगिंदर सुखीजा यांनी दिलेल्या माहितीनुसार, देशभरातील १५०० हून अधिक ठिकाणी हा उपक्रम एकाच वेळी पार पडणार असून, जलसंवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी हे ऐतिहासिक पाऊल ठरणार आहे. पाणी हे केवळ नैसर्गिक साधन नसून जीवनाचा मूलाधार आहे. त्याचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य असल्याचा संदेश या अभियानातून दिला जाणार आहे. सन २०२३ मध्ये संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने ‘प्रोजेक्ट अमृत’ची सुरुवात करण्यात आली होती. सद्गुरु बाबा हरदेव सिंह जी यांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या या उपक्रमाने पहिल्या तीन टप्प्यांत व्यापक जनसहभाग मिळवला आहे. आता चौथा टप्पा अधिक व्यापक, संघटित आणि दूरदृष्टीपूर्ण स्वरूपात राबविण्यात येत आहे.

या मोहिमेदरम्यान नदी, तलाव, विहिरी व झरे यांची स्वच्छता केली जाणार असून मधुर समूहगायन, चर्चासत्रे आणि सोशल मीडियाद्वारे जलजन्य आजारांविषयी जागरूकता निर्माण केली जाणार आहे. ‘स्वच्छ जलातून स्वच्छ मन आणि स्वच्छ समाज’ हा संदेश प्रत्येकापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न होणार आहे.

**सतगुरू माताजींचा संदेश**

● सतगुरू माताजींचा संदेश आहे की, पुढील पिढ्यांसाठी पृथ्वी अधिक स्वच्छ, सुंदर आणि संतुलित ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. ‘प्रोजेक्ट अमृत’चा हा चौथा टप्पा समाजात पर्यावरणाबद्दल संवेदनशीलता निर्माण करून निसर्गाशी सुसंवाद साधणाऱ्या भविष्याची पायाभरणी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## पुणे पोलिसांनी उधळला खुनाचा डाव; पिस्तुलासह सुपारी घेणारा जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पूर्वी झालेल्या खुनी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी आठ जणांनी एकत्र येत सराईत गुन्हेगाराच्या खुनाची सुपारी दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने वेळीच सापळा रचत हा डाव उधळून लावला. पिस्तुल आणि दोन जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या आरोपीला अटक करण्यात आली असून सुपारी देणाऱ्या आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेला आरोपी चेतन उर्फ बाळ्या सिद्धनाथ जाधव (वय २६, रा. दांडेकर पूल, सिंहगड रस्ता) आहे. ही कारवाई १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास दांडेकर पूल परिसरात करण्यात आली. गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकाला गोपनीय माहिती मिळाल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचण्यात आला. संशयिताला ताब्यात घेतल्यावर त्याच्या कमरेला पिस्तुल खोचलेले आढळले. चौकशीत त्याने आपली ओळख सांगितली. या प्रकरणी सिंधू धोत्रे उर्फ आक्का, सिन्नू झरेकर, पिंकी रेणुसे, गणेश रेणुसे, अमन झरेकर, सुमित माने, निशांत राऊत आणि बापू कांबळे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पर्वती पोलीस ठाण्यात पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे मोठी अनर्थ टळली असून शहरातील गुन्हेगारीवर लगाम घालण्याच्या दृष्टीने ही महत्त्वाची कारवाई मानली जात आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### वळतीत शिवजयंती उत्साहात साजरी

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील वळती गावात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. ऐतिहासिक किल्ले शिवनेरी येथून शिवज्योत आणून उत्सवाची सुरुवात झाली. भोकरवस्ती येथे ढोल-ताशांच्या गजरात शिवज्योतीचे स्वागत करण्यात आले. लेझीम पथकाच्या तालावर भोकरवस्ती ते वळती गावठाणापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. "छत्रपती शिवाजी महाराज की जय" अशा घोषणांनी परिसर दुमदुमला.

### वंडर किड्स प्री स्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात

**मंचर :** वंडर किड्स प्री स्कूल येथे शिवजयंती उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका कांबळे, आरोग्य सहाय्यक सुनिता राठोड यांच्यासह आशा स्वयंसेविका उपस्थित होत्या. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून जन्मोत्सवाचा पाळणा साजरा करण्यात आला. बालचमूंनी पोवाडा, शिवगर्जना व नृत्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली.

### आळंदीत शिवजन्मोत्सव विविध उपक्रमांनी साजरा

**लोणी काळभोर :** रक्तदान शिबिर, सांस्कृतिक कार्यक्रमांतून शिवमय जल्लोष

आळंदी : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आळंदी पंचक्रोशीत शिवजन्मोत्सव सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक उपक्रमांनी साजरा झाला.

---

**मध्यरात्री प्रचंड गर्दीमुळे नियोजन कोलमडले; जखमींवर जुन्नर व मंचर येथे उपचार ; १५ ते २० जखमी**

# शिवनेरी किल्ल्यावर चेंगराचेंगरीसदृश परिस्थिती!

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**जुन्नर :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मस्थळ असलेल्या शिवनेरी किल्ला येथे शिवजयंतीनिमित्त जमलेल्या अभूतपूर्व गर्दीमुळे चेंगराचेंगरीसदृश स्थिती निर्माण झाली. या घटनेत महिला आणि लहान मुलांसह १५ ते २० शिवभक्त जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यभरातून शिवज्योत घेऊन येणारे तरुण, विविध संघटनांचे कार्यकर्ते आणि हजारो शिवभक्त मध्यरात्रीपासून गडावर दाखल झाले होते. 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. मात्र क्षमतेपेक्षा जास्त गर्दी झाल्याने पहाटेच्या सुमारास परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली.

**अरुंद मार्गांवर तुफान गर्दी**

गडावरील अंबरखाण्याखालचा हत्ती दरवाजा परिसर आणि गणेश दरवाजा हे मार्ग अत्यंत अरुंद आहेत. एकाच वेळी हजारो भाविक या मार्गांवर जमा झाल्याने मोठी कोंडी निर्माण झाली. वरून खाली उतरणाऱ्यांचा लोंढा वाढला, तर खालीवर जाणाऱ्यांना जागाच उरली नाही. अशा गोंधळात काहींनी ढकलाढकली केल्याने काही शिवभक्त तोल जाऊन खाली पडले. रस्ते लहान आणि लोकसंख्या प्रचंड असल्याने चेंगराचेंगरीसदृश प्रसंग निर्माण झाला. या गोंधळात काही महिला व लहान मुलेही जखमी झाली.

**जखमींवर तातडीने उपचार**

घटनेनंतर जखमींना तातडीने गडाखाली आणून जुन्नर येथील शासकीय रुग्णालय तसेच मंचर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या सर्व जखमींची प्रकृती स्थिर असून उपचार सुरू आहेत.

**पोलीस अधीक्षकांचे स्पष्टीकरण**

याबाबत संदीप सिंग गिल, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी सांगितले की, "दरवर्षीप्रमाणे यंदाही हजारो शिवभक्त शिवनेरीवर दाखल झाले होते. पहाटे साडेतीनच्या सुमारास मीना दरवाजाजवळ एक गट वेगाने खाली उतरत होता. तेथे तैनात पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र वरून कोणीतरी धक्का दिल्याने काही लोक खाली पडले आणि त्यात काही जण जखमी झाले. परिस्थिती नियंत्रणात असून अफवांवर विश्वास ठेवू नये."

**गर्दी नियोजनाबाबत प्रश्नचिन्ह**

गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पुरेशी यंत्रणा तैनात नव्हती, असा दावा स्थानिकांकडून करण्यात येत आहे. शिवजयंतीसारख्या मोठ्या उत्सवावेळी दरवर्षी लाखोंची गर्दी होत असल्याने भविष्यात अधिक सक्षम गर्दी व्यवस्थापन, स्वतंत्र प्रवेश-निर्गमन मार्ग, तसेच वाढीव पोलीस बंदोबस्त ठेवण्याची गरज व्यक्त होत आहे. शिवभक्तांच्या उत्साहात घडलेल्या या घटनेमुळे हळहळ व्यक्त होत असली, तरी सुदैवाने मोठा अनर्थ टळला आहे. आगामी काळात अशा ऐतिहासिक स्थळांवरील मोठ्या उत्सवांसाठी अधिक काटेकोर नियोजन करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

---

# वन विभागाच्या पिंजऱ्यात बिबट मादी जेरबंद




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** गेल्या काही दिवसांपासून नागरिकांना वारंवार दर्शन देत शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत असलेली बिबट मादी अखेर वन विभागाच्या पिंजऱ्यात जेरबंद झाली. ओतूर येथील गाढवेपट परिसरात लावण्यात आलेल्या पिंजऱ्यात गुरुवारी (दि.१९) पहाटे साडेपाचच्या सुमारास ती अडकली, अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे यांनी दिली.

नागरिकांच्या वाढत्या मागणीनुसार वन विभागाने या भागात पिंजरा लावला होता. बिबट्याच्या हालचालींची नोंद घेत योग्य ठिकाणी सापळा रचण्यात आला होता. पहाटे बिबट मादी पिंजऱ्यात अडकल्याचे लक्षात येताच वन विभागाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल एस. एम. बुट्टे, वनरक्षक के. एस. खरोडे व किसन केदार यांनी पाहणी करून बिबट मादीला सुरक्षितरित्या ताब्यात घेतले. त्यानंतर तिला माणिकडोह बिबट निवारा केंद्र येथे हलविण्यात आले.

सदर बिबट मादीचे वय अंदाजे एक ते दीड वर्षे असल्याचा प्राथमिक अंदाज वन विभागाने व्यक्त केला आहे.

---

# अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात शिवजयंतीनिमित्त ऐतिहासिक प्रदर्शन

**गडकिल्ल्यांच्या प्रतिकृती, शस्त्रास्त्रे व नाण्यांद्वारे विद्यार्थ्यांनी उलगडला शिवकालीन वारसा**

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मंचर :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त अण्णासाहेब आवटे महाविद्यालय येथे इतिहास विभागाच्या वतीने गडकिल्ल्यांच्या प्रतिकृती, पारंपरिक शस्त्रास्त्रे, नाणी व ऐतिहासिक वस्तूंचे आकर्षक प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थी व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. लहू गायकवाड उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी रायगड किल्ला, जंजिरा किल्ला, लोहगड किल्ला, नाणेघाट, प्रतापगड किल्ला आणि सुवर्णदुर्ग किल्ला यांसारख्या ऐतिहासिक स्थळांच्या प्रतिकृती अत्यंत कल्पकतेने व अभ्यासपूर्ण पद्धतीने साकारल्या होत्या.

प्रा. डॉ. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत इतिहासाच्या अभ्यासाला प्रत्यक्ष कृतीची जोड देणे आवश्यक असल्याचे सांगितले. "अशा उपक्रमांमुळे इतिहास जिवंत होतो आणि विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते," असे ते म्हणाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा आणि दूरदृष्टीचा उल्लेख करत इतिहास केवळ पुस्तकापुरता मर्यादित न ठेवता त्याचे जतन व संवर्धन करणे ही विद्यार्थ्यांची जबाबदारी असल्याचे नमूद केले. अशा प्रदर्शनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती आणि ऐतिहासिक जाण निर्माण होते, असे त्यांनी सांगितले. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी पारंपरिक शस्त्रास्त्रांच्या प्रतिकृती, शिवकालीन नाणी तसेच दैनंदिन वापरातील ऐतिहासिक वस्तूंचे सादरीकरण केले.

---

# वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कारांची घोषणा

**पुणे विभागातून आंबेगाव तालुका पत्रकार संघाची राज्यस्तरीय सन्मानासाठी निवड**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून पुणे विभागातून आंबेगाव तालुका पत्रकार संघ यांची निवड करण्यात आली आहे. ही माहिती संघाचे अध्यक्ष संतोष वळसे पाटील आणि उपाध्यक्ष निलेश कान्नव यांनी दिली.

पुरस्कार वितरण सोहळा रविवार (दि.२२) रोजी रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील रॉयल गार्डन येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

दरवर्षी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद यांच्या वतीने पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ आणि वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ हे राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येतात. यंदाचा पुरस्कार वितरण समारंभ व राज्यातील तालुका अध्यक्षांचा मेळावा कर्जत येथे होत आहे.

पत्रकार संघ विविध सामाजिक, शैक्षणिक व प्रबोधनात्मक उपक्रम राबवत असल्याने त्यांच्या कार्याचा राज्य पातळीवर गौरव व्हावा, या उद्देशाने प्रत्येक महसूल विभागातून एका तालुका पत्रकार संघाची निवड करण्यात येते. त्यानुसार पुणे विभागातून आंबेगाव तालुका पत्रकार संघाची निवड झाली आहे.

आंबेगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी ग्रामीण पत्रकारांसाठी कार्यशाळा आयोजित केली जाते. तसेच आरोग्य शिबिरे, समाजप्रबोधन कार्यक्रम, पत्रकार बांधवांसाठी विविध उपक्रम राबवले जात असल्याने संघाच्या कार्याची दखल घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. या पुरस्कार वितरण सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे तसेच जिल्हाध्यक्ष सुनील लोणकर यांनी केले आहे.

आंबेगाव तालुक्यासाठी ही अभिमानाची बाब मानली जात असून पत्रकार संघाच्या कार्याला राज्यस्तरावर मिळालेल्या या सन्मानाबद्दल सर्वत्र समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

---

# निरगुडसर व लोणी येथे दहावी बोर्ड परीक्षेची जय्यत तयारी

**सीसीटीव्ही व बैठेपथकासह कॉपीमुक्त वातावरणाची हमी**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी (ता. आंबेगाव) :** इयत्ता दहावीच्या राज्य मंडळाच्या परीक्षेसाठी निरगुडसर व लोणी परिसरातील परीक्षा केंद्रांवर सर्व तयारी पूर्ण झाली असून विद्यार्थ्यांना सुरक्षित, शिस्तबद्ध व कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा देता यावी यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

निरगुडसर येथील पं. ज. नेहरू माध्यमिक विद्यालय व द. गो. वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालय येथे दहावीच्या परीक्षेसाठी १७ ब्लॉकची व्यवस्था करण्यात आली आहे. या केंद्रावर एकूण ४०४ विद्यार्थी परीक्षेला बसणार असल्याची माहिती केंद्र संचालक तथा प्राचार्य कांताराम टाव्हरे यांनी दिली. उपकेंद्र संचालक म्हणून दत्तू खाडे व संतोष वळसे हे जबाबदारी सांभाळणार आहेत. परीक्षेचे पारदर्शक व सुरळीत आयोजन होण्यासाठी प्रत्येक ब्लॉकमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून स्वतंत्र बैठेपथकही कार्यरत असणार आहे. निरगुडसरसह शिंगवे, पारगाव, लाखणगाव, जारकरवाडी, पिंपळगाव व खडकी येथील विद्यार्थ्यांचा या केंद्रावर समावेश आहे.

प्राचार्य टाव्हरे यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, "परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात होणार आहे. विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारचा ताण न घेता आत्मविश्वासाने परीक्षा द्यावी." संस्थेचे अध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांनीही सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या असून उत्तम यश संपादन करण्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

दरम्यान, लोणी येथील भैरवनाथ विद्याधाम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथेही दहावी बोर्ड परीक्षेची संपूर्ण तयारी पूर्ण झाली असल्याचे केंद्रप्रमुख तथा प्राचार्य रविंद्र ढगे यांनी सांगितले. परीक्षा सुरळीत पार पडावी यासाठी आवश्यक

---

### अज्ञात वाहनाच्या धडकेत पादचारी ठार

**ओतूर :** अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर ओतूर येथील हॉटेल वायकर्सजवळ अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत एक पादचारी जागीच ठार झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दत्तात्रेय लक्ष्मण अल्हाट (वय ५५, रा. ओतूर, ता. जुन्नर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. प्राथमिक माहितीनुसार, ओतूरकडून कल्याणच्या दिशेने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली. अपघाताची माहिती मिळताच ओतूर पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. जखमी अवस्थेत अल्हाट यांना तातडीने ओतूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. पुढील तपास ओतूर पोलीस करीत आहेत. दरम्यान, आळेफाटा-ओतूर व ओतूर-पारगाव फाटा दरम्यान महामार्गावर वारंवार अपघात घडत असल्याची बाब समोर आली आहे.

---

# शिवजयंतीनिमित्त पारगावात शिवभक्तांना मसाला दुधाचे वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव (ता. आंबेगाव) :** शिवजयंतीनिमित्त पारगाव येथे चक्रधर नवतरुण मित्र मंडळ व तुकाई देवी मित्र मंडळाच्या वतीने शिवभक्तांना मसाला दुधाचे वाटप करण्यात आले. यंदा या उपक्रमाचे सलग सहावे वर्ष असून शिवभक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मंडळाच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही शिरूर तालुक्यासह परिसरातील अनेक गावांतील शिवभक्त शिवजन्मस्थान किल्ले शिवनेरी येथे दर्शनासाठी गेले होते. तेथे शिवजन्मोत्सव साजरा करून भाविक वाजत-गाजत शिवजोत घेऊन आपल्या गावी परतले. ढोल-ताशांच्या गजरात, भगव्या पताका फडकावत आणि जयघोष करत शिवभक्तांची मिरवणूक अष्टविनायक महामार्गावरील निमनबेट मार्गे पारगावातून जात असताना मंडळाच्या वतीने स्वागताची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. रात्रभर प्रवास करून येणाऱ्या शिवभक्तांसाठी मंडप उभारून मसाला दुधाचे वाटप करण्यात आले. पंचायत समिती सदस्या श्वेता ढोबळे यांनी या उपक्रमास भेट देत मंडळाच्या कार्याचे कौतुक केले.

माजी ग्रामपंचायत सदस्य प्रकाश ढोबळे यांच्या वतीने मोफत १२ कॅन मसाला दुधाचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाची व्यवस्था सानिका ढोबळे, माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे, विरेंद्र ढोबळे, डॉ. गुलाब गोसावी, बबनराव ढोबळे, दत्ताराम वैद, दिलीप लोखंडे, ह.भ.प. निवृत्ती लोखंडे आदींनी पाहिली.

---

**"शिवरायांच्या मार्गावर चालणे हाच विकासाचा खरा मार्ग" - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

# किल्ले शिवनेरीवर छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव उत्साहात साजरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** शिवजन्मभूमी असलेल्या शिवनेरी किल्ला येथे १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव राज्यभरातील शिवभक्तांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी "छत्रपती शिवरायांनी दाखविलेला मार्ग हाच सर्वांगीण विकासाचा खरा मार्ग आहे," असे प्रतिपादन केले. २०३० साली शिवरायांची ४०० वी जयंती भव्य आणि जागतिक स्तरावर साजरी केली जाईल, अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली.

कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार शरद सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके, विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अभिनेता रितेश देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराज नसते तर भारताचा इतिहास आणि भूगोल वेगळा असता." आई जिजाऊंनी घडविलेल्या शिवरायांनी १८ पगड जातींच्या मावळ्यांना एकत्र करून रयतेचे स्वराज्य स्थापन केले. समता, न्याय, स्त्रीसुरक्षा आणि शेतकरीहित यांना प्राधान्य देणारी राज्यव्यवस्था त्यांनी उभी केली. सुमारे ५० प्रकारचे कर रद्द करून सुटसुटीत करप्रणाली निर्माण केली तसेच जलदुर्ग उभारून समुद्रमार्गे होणाऱ्या आक्रमणांना आळा घातला, असे त्यांनी नमूद केले.

शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष देणारे राज्यातील गड-किल्ले जतन करण्याचा निर्धार व्यक्त करत त्यांनी सांगितले की, शिवनेरीसह १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळाला असून २७ देशांनी त्यास मान्यता दिली आहे. सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, "शिवरायांच्या विचारांवर चालत बलशाली आणि स्वाभिमानी महाराष्ट्र घडवू." गड-किल्ल्यांचे जतन व संवर्धन अधिक वेगाने करण्यात येईल तसेच बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त स्वच्छता व जतन मोहीम राबविण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी शिवनेरी हे केवळ ऐतिहासिक स्थळ नसून प्रेरणास्थान असल्याचे नमूद केले. 'किल्ले शिवनेरी विकास आराखडा' आणि जुन्नर तालुक्याला पर्यटन तालुका म्हणून विकसित करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी पारंपरिक वेशातील महिलांनी शिवजन्मस्थानी पाळणा गायिला. पोलीस बँड पथकाने राष्ट्रगीत आणि 'गर्जा महाराष्ट्र माझा'ची धून वाजवून मानवंदना दिली. मान्यवरांच्या हस्ते बाल शिवाजी व माँ जिजाऊंच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांना 'शिवनेर भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिवभक्तांच्या जयघोषात पार पडलेल्या या सोहळ्याने शिवनेरी गड पुन्हा एकदा शिवमय झाला.

---

# वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कारांची घोषणा

**आंबेगाव तालुका पत्रकार संघाचा गौरव**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून पुणे विभागातून आंबेगाव तालुका पत्रकार संघ यांची निवड झाली आहे. ही माहिती संघाचे अध्यक्ष संतोष वळसे पाटील आणि उपाध्यक्ष निलेश कान्नव यांनी दिली.

पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दि. २२ रोजी रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे रॉयल गार्डन येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

दरवर्षी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद यांच्या वतीने पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ आणि वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ हे राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान केले जातात. यंदा या पुरस्कार वितरण सोहळ्यासोबत राज्यातील तालुका अध्यक्षांचा मेळावा देखील कर्जत येथे होत आहे.

पत्रकार संघ विविध सामाजिक, शैक्षणिक व प्रबोधनात्मक उपक्रम राबवत असल्याने त्यांच्या कार्याचा राज्य पातळीवर गौरव व्हावा, या उद्देशाने प्रत्येक महसूल विभागातून एका तालुका पत्रकार संघाची निवड करण्यात येते. त्यानुसार पुणे विभागातून आंबेगाव तालुका पत्रकार संघाची निवड करण्यात आली आहे.

## सारांश वृत्त

### काँग्रेस आमदारांचा राजस्थानात सभात्याग

**जयपूर :** राजस्थान विधानसभेतून नगरविकास मंत्री झबर सिंग यांनी राज्यातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पूर्ण होण्यास झालेल्या विलंबासाठी मागील गेहलोत सरकारला जबाबदार धरल्यानंतर काँग्रेस आमदारांनी सभात्याग केला. खर्रा यांनी मागील सरकारच्या कार्यकाळातील प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील त्रुटींकडे लक्ष वेधले. मागील सरकारच्या काळात अनेक सांडपाणी प्रकल्प हाती घेण्यात आले होते, परंतु त्यांचे संचालन आणि व्यवस्थापन योग्यरित्या पाळले गेले नाही, असा काँग्रेसचा आरोप आहे.

### दिल्लीत वाहतूक निर्बंध, सूचना जारी

**नवी दिल्ली :** शुक्रवारी दुपारी राष्ट्रीय राजधानीतील अनेक प्रमुख रस्त्यांवर वाहतूक निर्बंध आणि मार्ग बदल लागू राहतील, असे दिल्ली वाहतूक पोलिसांनी एका सूचनापत्रात म्हटले आहे. दिल्ली येथे इंडिया एआय इम्पॅक्ट समिटचे आयोजन केले जात आहे, ज्यामध्ये ५०० हून अधिक जागतिक एआय नेते आणि १०० हून अधिक सरकारी प्रतिनिधी उपस्थित आहेत, ज्यात २० हून अधिक राष्ट्र आणि सरकार प्रमुखांचा समावेश आहे. मध्य आणि उत्तर दिल्लीतील अनेक प्रमुख मार्गांवर दुपारी १ ते सायंकाळी ५.३० दरम्यान वाहतूक प्रभावित होण्याची शक्यता आहे, असे यात म्हटले आहे.

### पश्चिम बंगालमध्ये अधिकाऱ्यांच्या बदल्या

**कोलकाता:** पकोलकाता पश्चिम बंगाल सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी नवीन प्रशासकीय फेरबदलात तीन पोलिस अधीक्षकांसह चार आयपीएस अधिकाऱ्यांची बदली केली. एका अधिसूचनेनुसार, अलीपुरद्वारचे एसपी उमेश गणपत खांडबहाले यांची उत्तर बंगाल इंटेलिजेंस ब्युरोमध्ये वरिष्ठ अधीक्षक म्हणून बदली करण्यात आली आहे. गुप्तचर शाखेचे वरिष्ठ अधीक्षक आरिश बिलाल यांची बसीरहाट पोलिस जिल्ह्याचे नवीन अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### एप्रिल पासून २२ राज्यांत मतदार याद्यांचे विशेष सघन पुनरीक्षण

# एसआयआरसाठी तयार राहण्याचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** निवडणूक आयोगाने एप्रिल पासून देशातील उर्वरित २२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदार याद्यांचे विशेष सघन पुनरीक्षण (एसआयआर) सुरू करणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना आवश्यक पूर्वतयारी तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

गुरुवारी पाठवलेल्या पत्रात आयोगाने नमूद केले की, "वरील राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेष सघन सुधारणा एप्रिल २०२६ पासून सुरू होण्याची अपेक्षा असल्याने, एसआयआरशी संबंधित तयारीचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे." ज्या राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांत ही प्रक्रिया राबवली जाणार आहे




त्यात आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, चंदीगड, दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव, हरियाणा, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, झारखंड, कर्नाटक, लडाख, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, दिल्ली, ओडिशा, पंजाब आदींचा समावेश आहे.

गेल्या वर्षी २४ जून रोजी निवडणूक आयोगाने देशभरात मतदार याद्यांचे एसआयआर करण्याचे आदेश दिले होते. या प्रक्रियेत मतदार यादी नव्याने तयार करण्याचा समावेश आहे. २०२५ मध्ये विधानसभा निवडणुका होणाऱ्या बिहारपासून या मोहिमेची सुरुवात करण्यात आली.

आयोगाने ५ जुलै २०२५ रोजी बिहार वगळता इतर सर्व मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना एसआयआरसाठी पूर्व-सुधारणा उपक्रम सुरू करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर २७ ऑक्टोबर रोजी १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांत प्रत्यक्ष सघन पुनरीक्षण सुरू करण्यात आले. आसाममध्ये मात्र राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी) अद्याप अंतिम न झाल्याने तेथे एसआयआर न करण्याचा निर्णय घेण्यात आला.

एसआयआरच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, सर्व विद्यमान नोंदणीकृत मतदारांना गणना फॉर्म सादर करणे बंधनकारक असेल. काही विशिष्ट श्रेणीतील मतदारांना पात्रता सिद्ध करण्यासाठी, नागरिकत्वासह अतिरिक्त कागदपत्रे सादर करावी लागतील. २००० च्या दशकाच्या सुरुवातीस मतदार याद्या नव्याने तयार केल्यानंतर इतक्या व्यापक प्रमाणात सखोल पुनरावलोकन करण्यात आलेले नाही. त्यानंतर दरवर्षी आणि प्रत्येक निवडणुकीपूर्वी केवळ नावांची भर किंवा वगळणे अशा स्वरूपात अद्ययावत प्रक्रिया राबवली जात होती.

दरम्यान, एसआयआरच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. याचिकाकर्त्यांनी नागरिकत्व तपासणी करण्याच्या निवडणूक आयोगाच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, ही प्रक्रिया लोकप्रतिनिधी कायदा, १९५० चे उल्लंघन असल्याचा दावा केला आहे. तसेच मागील सघन पुनरीक्षणांमध्ये अवलंबलेल्या प्रक्रियेपेक्षा ही पद्धत वेगळी असल्याचेही याचिकेत नमूद करण्यात आले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणातील युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर निकाल राखून ठेवला आहे. आगामी काळात न्यायालयाचा निर्णय आणि एसआयआरची अंमलबजावणी याकडे राजकीय व प्रशासकीय वर्तुळांचे लक्ष लागले आहे.

# भारत-बांगलादेश संबंधांत निवडणुकीनंतर सुधारणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सार्वत्रिक निवडणुकांनंतर भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंधांमध्ये सुधारणा होत असल्याचे संकेत मिळत आहेत. व्हिसा सेवा पूर्णपणे पुन्हा सुरू करण्याच्या तयारीसह क्रीडा क्षेत्रातील संवाद वाढवण्याच्या हालचालींमुळे द्विपक्षीय संबंधांमध्ये सकारात्मक बदल दिसून येत आहे.

माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या सरकारच्या पतनानंतर मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकार सत्तेवर आले होते. त्या काळात दोन्ही देशांतील संबंध काहीसे ताणलेले होते. मात्र अलीकडील घडामोडींमुळे संवादाचा सूर बदलताना दिसत आहे. व्हिसा सेवा पुन्हा सुरू करण्याच्या प्रक्रियेबाबत बांगलादेशातील भारताचे वरिष्ठ कॉन्सुलर अधिकारी अनिरुद्ध दास यांनी सिल्हेट जिल्हा प्रेस क्लबमध्ये माहिती दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार, सध्या वैद्यकीय आणि दुहेरी प्रवेश व्हिसा जारी केले जात आहेत. प्रवासी व्हिसासह इतर श्रेणीतील सेवा लवकरच पूर्णपणे पुन्हा सुरू करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. भारत-बांगलादेश संबंध परस्पर आदर, प्रतिष्ठा आणि ऐतिहासिक-सांस्कृतिक नात्यांवर आधारित असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, क्रीडा क्षेत्रातही संबंध सुधारण्याचे प्रयत्न सुरू आहेत. बांगलादेशचे क्रीडामंत्री अमिनुल हक यांनी भारतासोबत, विशेषतः क्रिकेट क्षेत्रात, संवाद वाढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यांनी बीसीसीआय सोबत संबंध अधिक दृढ करण्याची भूमिका मांडली. आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये बांगलादेशच्या सहभागाबाबत निर्माण झालेल्या अडचणींबाबत प्रश्न लवकर सोडवण्याची तयारी असल्याचे त्यांनी सांगितले. भारताच्या उपउच्चायुक्तांशी या विषयावर सौहार्दपूर्ण चर्चा झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# रशियन तेलप्रश्नी भारत लक्ष्य नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी रशियाकडून तेल खरेदीच्या मुद्द्यावर महत्त्वपूर्ण भूमिका स्पष्ट केली आहे. अमेरिका या संदर्भात भारताला लक्ष्य करत नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. हा प्रश्न केवळ भारतापुरता मर्यादित नसून युक्रेन-रशिया युद्ध संपवण्याच्या व्यापक प्रयत्नांचा भाग असल्याचे त्यांनी नमूद केले.

नवी दिल्ली येथे आयोजित 'इंडिया एआय समिट'दरम्यान पत्रकार परिषदेत ते बोलत होते. रशियन तेल खरेदीवर अमेरिकेच्या भूमिकेबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना गोर म्हणाले, "तेलाबाबत एक करार झाला आहे. भारताने आपल्या तेलस्रोतांमध्ये विविधता आणली आहे. हे भारताबद्दल नाही. अमेरिकेला कोणताही देश रशियाकडून तेल खरेदी करावा असे वाटत नाही. राष्ट्रपती या बाबतीत स्पष्ट आहेत. त्यांना हे युद्ध संपवायचे आहे आणि संघर्षाचा अंत पाहायचा आहे." गोर यांनी सांगितले की अमेरिका रशियावरील ऊर्जा अवलंबित्व कमी करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. युक्रेनवरील रशियाच्या आक्रमणानंतर ऊर्जा व्यवहारांवर निर्बंध आणि दबाव वाढवण्यात आला आहे. गेल्या वर्षी अमेरिकेने रशियाकडून तेल खरेदीच्या कारणावरून भारतावर ५० टक्के अतिरिक्त कर लादला होता. त्या वेळी ट्रम्प प्रशासनातील काही अधिकाऱ्यांनी भारतावर थेट टीका करत रशियन तेल खरेदीमुळे युद्धाला आर्थिक आधार मिळत असल्याचा आरोप केला होता.

दरम्यान, भारताने आपल्या भूमिकेवर सातत्याने ठाम भूमिका घेतली आहे. परराष्ट्र मंत्रालयाने यापूर्वी स्पष्ट केले आहे की, देशाच्या १.४ अब्ज लोकसंख्येच्या ऊर्जा गरजांशी तडजोड केली जाणार नाही. भू-राजकीय घडामोडी लक्षात घेऊन भारत ऊर्जा स्रोतांमध्ये विविधता आणत आहे.

# भारत 'पॅक्स सिलिका' युतीत सहभागी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** एआय समिटदरम्यान भारताने अमेरिकेच्या नेतृत्वाखालील 'पॅक्स सिलिका' अलायन्समध्ये सहभागी होत सेमीकंडक्टर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील जागतिक सहकार्यास नवे परिमाण दिले. नवी दिल्ली येथे शुक्रवारी या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. या निर्णयामुळे भारत सेमीकंडक्टर आणि एआय क्षेत्रातील बहुराष्ट्रीय पुरवठा साखळी युतीचा भाग ठरला आहे.

'पॅक्स सिलिका'चे प्रमुख उद्दिष्ट सेमीकंडक्टर आणि दुर्मिळ पृथ्वी घटकांचा पुरवठा अखंडित ठेवणे, तसेच विशिष्ट देशांवरील अवलंबित्व




कमी करणे हे आहे. करारात कोणत्याही देशाचे नाव स्पष्टपणे नमूद नसले तरी पुरवठा साखळीचे विविधीकरण आणि धोरणात्मक स्वायत्तता यावर दिलेला भर चीनकडे निर्देश करतो, असे विश्लेषकांचे मत आहे. पाकिस्तान याचा भाग नाही.

या युतीत अमेरिका आणि भारतासह ऑस्ट्रेलिया, ग्रीस, इस्रायल, जपान, कतार, दक्षिण कोरिया, सिंगापूर, ब्रिटन आणि संयुक्त अरब अमिराती यांचा समावेश आहे. सहभागी देशांनी उत्पादन, चिप डिझाइन आणि पुरवठा साखळी व्यवस्थापनात परस्पर सहकार्य वाढवण्याचे ठरवले आहे. पाच दिवस चाललेल्या एआय समिटमध्ये सुमारे ६०० स्टार्टअप्ससह जगभरातील तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी प्रतिनिधी सहभागी झाले होते.

कराराची घोषणा करताना केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञानमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, "जग भारतावर विश्वास ठेवते. आमच्याकडे मोठ्या प्रमाणात तांत्रिक कौशल्य आहे आणि विश्वासार्ह परराष्ट्र धोरण आहे. 'पॅक्स सिलिका'त सहभागी होणे सेमीकंडक्टर पुरवठा साखळी, उत्पादन आणि चिप डिझाइनसाठी महत्त्वाचे ठरेल." या करारामुळे इलेक्ट्रॉनिक्स व सेमीकंडक्टर उद्योगात देशाला वेग मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

वैष्णव यांनी सांगितले की देशात १० प्रकल्पांची उभारणी पूर्ण झाली असून लवकरच पहिला सेमीकंडक्टर प्रकल्प उत्पादन सुरू करेल. भारतात अत्याधुनिक नॅनोमीटर चिप्सचे डिझाइन होत असल्याचे त्यांनी नमूद केले. एआय आणि सेमीकंडक्टर क्षेत्रासाठी सक्षम परिसंस्था निर्माण होत असून 'पॅक्स सिलिका' करार हा त्यातील महत्त्वाचा टप्पा असल्याचे त्यांनी सांगितले.

# पतीने एकदा केलेली मारहाण ही क्रूरता नव्हे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहमदाबाद :** पत्नीवर क्रूरता केल्याचा आणि तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप असलेल्या पतीची दोषसिद्धी रद्द करत गुजरात उच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. पत्नीने न सांगता माहेरी राहिल्यामुळे झालेली एकच मारहाण ही भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८अ अंतर्गत 'क्रूरता' ठरत नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने पतीची शिक्षा रद्द केली.

न्यायमूर्ती गीता गोपी यांनी दिलेल्या निर्णयात नमूद केले की, आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी ठोस व थेट पुरावे आवश्यक असतात. केवळ वैवाहिक वाद किंवा किरकोळ मारहाण यावरून कलम ३०६ अंतर्गत गुन्हा ठरवता येत नाही. १९९६ मध्ये विवाह झाल्यानंतर एका वर्षाच्या आत संबंधित महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. कनिष्ठ न्यायालयाने २० मे २००३ रोजी पतीला कलम ४९८अ अंतर्गत एक वर्ष सक्तमजुरी व दंड, तर कलम ३०६ अंतर्गत सात वर्ष सक्तमजुरीची शिक्षा सुनावली होती. या निर्णयाविरोधात पतीने उच्च न्यायालयात अपील केले होते. असा आरोप होता की पती वारंवार पत्नीशी भांडत असे, लग्नसमारंभात 'बँजो' वाजवून रात्री उशिरा घरी परतत असे आणि पत्नीने न सांगता माहेरी राहिल्यामुळे त्याने तिला मारहाण केली होती. मात्र, उच्च न्यायालयाने साक्षीपुराव्यांचे विश्लेषण करताना नमूद केले की जोडप्यातील वादांचे मुख्य कारण पतीचे रात्री उशिरा घरी येणे हे होते. पती रात्री 'बँजो' वाजवून घरी परतल्यानंतर पती-पत्नीमध्ये वाद होत असत; परंतु हे वाद सामान्य वैवाहिक कलहाच्या स्वरूपाचे होते. ते कायदेशीर दृष्ट्या सतत व असह्य क्रूरता या पातळीवर पोहोचत नाहीत. तसेच, सतत मारहाणीचे आरोप सिद्ध करणारा कोणताही स्वतंत्र किंवा वैद्यकीय पुरावा नोंदीवर नसल्याचे न्यायालयाने नमूद केले.

### सर्वोच्च न्यायालयाचा सुनावणीस नकार

# बाबरी नावावर बंदीची मागणी फेटाळली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** बाबरी मशीद या नावाच्या वापरावर बंदी घालण्याची मागणी करणारी जनहित याचिका शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली; मात्र न्यायालयाने ती तातडीने फेटाळून लावत सुनावणीस नकार दिला. पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद येथे 'बाबरी' नावाची मशीद उभारण्याच्या पार्श्वभूमीवर ही याचिका दाखल झाली होती.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदिप मेहता यांच्या खंडपीठासमोर प्रकरणाचा उल्लेख करण्यात आला. याचिकाकर्त्यांच्या वतीने मांडण्यात आले की, बाबर हा आक्रमक असल्याने त्याच्या नावाने कोणतीही मशीद उभारू नये किंवा त्याचे नामकरण करू नये. संबंधित ऐतिहासिक संदर्भांचा उल्लेख करत कारवाईची मागणीही करण्यात आली. मात्र खंडपीठाने या मुद्द्यांवर सविस्तर सुनावणी करण्यास नकार दिला.

दरम्यान, पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यात 'बाबरी' नावाची मशीद उभारण्याच्या घोषणेमुळे राजकीय वादाला तोंड फुटले आहे.



तृणमूल काँग्रेसचे निलंबित आमदार हुमायून कबिर यांनी बेलडांगा येथील रेजीनगर भागात ही मशीद उभारण्याची घोषणा केली आहे.

त्यांच्या मते, सुमारे ११ एकर जागेवर उभारल्या जाणाऱ्या या मशिदीत अंदाजे १२,००० लोक सामावू शकतील. प्रकल्प पूर्ण होण्यासाठी सुमारे २ वर्षांचा कालावधी अपेक्षित असून अंदाजे ५० ते ५५ कोटी खर्च येईल, असे त्यांनी ११ फेब्रुवारी रोजी सांगितले.

कबीर यांनी विरोधाच्या पार्श्वभूमीवरही काम नियोजित वेळापत्रकानुसार सुरू असल्याचा दावा केला आहे. गेल्या वर्षी ६ डिसेंबर रोजी अयोध्येतील बाबरी मशिदीच्या धर्तीवर उभारल्या जाणाऱ्या या मशिदीची पायाभरणी करण्यात आल्याचे त्यांनी जाहीर केले होते. या घोषणेनंतर राज्यातील विविध राजकीय पक्षांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

ऐतिहासिक पार्श्वभूमीचा विचार केला तर ६ डिसेंबर १९९२ रोजी अयोध्येतील वादग्रस्त बाबरी वास्तू कारसेवकांनी पाडली होती. त्यानंतर दीर्घकाळ न्यायालयीन प्रक्रिया सुरू राहिली. ९ नोव्हेंबर २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयाने निकाल देत वादग्रस्त जागेवर राम मंदिर उभारण्यास मान्यता दिली, तसेच मुस्लिम पक्षकारांना अयोध्येत प्रमुख ठिकाणी ५ एकर पर्यायी जमीन देण्याचे आदेश दिले.

सध्याच्या याचिकेच्या फेटाळणीमुळे 'बाबरी' या नावाच्या वापराबाबत न्यायालयीन स्तरावर तत्काळ हस्तक्षेप होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र मुर्शिदाबाद येथील प्रस्तावित मशिदीच्या उभारणीभोवतीचा राजकीय आणि सामाजिक वाद पुढील काळातही चर्चेचा विषय राहण्याची चिन्हे आहेत.

# सर्वोच्च न्यायालयात विद्यार्थ्याचा यशस्वी लढा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयात खटला चालवणे हे अनुभवी वकिलांसाठीही आव्हानात्मक मानले जाते. अशा तणावपूर्ण वातावरणात एका १९ वर्षीय विद्यार्थ्याने स्वतः उभे राहून युक्तिवाद केला आणि आपल्या प्रवेशासाठी लढा जिंकला. या घटनेमुळे कायदा व शिक्षण क्षेत्रात मोठी चर्चा रंगली आहे.

ही कहाणी आहे मध्य प्रदेशातील जबलपूर येथील अथर्व चतुर्वेदीची. नीट २०२४-२५ परीक्षेत ७२० पैकी ५३० गुण मिळवत त्याने परीक्षा उत्तीर्ण केली. २०२५-२६ साठी त्याला आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) प्रवर्गात १६४ वा क्रमांक मिळाला. मात्र राज्यात खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आरक्षणाची अंमलबजावणी न झाल्याने त्याला प्रवेश प्रक्रियेतून वगळण्यात आले. प्रवेश नाकारल्यानंतर अथर्वने ऑनलाइन याचिकेद्वारे थेट सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.

१० फेब्रुवारी रोजी सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर त्याने स्वतः आपली बाजू मांडण्याची विनंती केली. "मला फक्त १० मिनिटे द्या," अशी विनंती त्याने न्यायालयासमोर केली, अशी माहिती सोशल मीडियावरील पोस्टमधून पुढे आली. युक्तिवाद करताना अथर्वने १०३ वी घटनादुरुस्ती तसेच संविधानातील कलम १५(६) आणि १६(६) यांचा संदर्भ दिला.

या तरतुदीनुसार खाजगी, अल्पसंख्याक नसलेल्या शैक्षणिक संस्थांमध्ये १० टक्के ईडब्ल्यूएस आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

राज्य प्रशासनाने या घटनात्मक तरतुदींची अंमलबजावणी न केल्याने त्याचा प्रवेश अन्याय्यपणे रोखला गेला, असा त्याचा दावा होता.

खंडपीठाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे नमूद केले की, अथर्वला त्याच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे आणि संबंधित अधिकाऱ्यांनी न्यायालयीन आदेशांचे पालन न केल्यामुळे प्रवेश नाकारण्यात आला. न्यायालयाने नॅशनल मेडिकल कमिशन आणि मध्य प्रदेश सरकारला त्याचा खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश निश्चित करण्याचे निर्देश दिले.

# राजस्थान उच्च न्यायालयाला धमकी

**जयपूर :** भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या शहरात आगमनाच्या काही तास आधी शुक्रवारी राजस्थान उच्च न्यायालयाला बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. काहीही संशयास्पद आढळले नाही, परंतु सुरक्षेच्या कारणास्तव न्यायालयीन कामकाजाला विलंब झाला, असे त्यांनी सांगितले. उच्च न्यायालय प्रशासनाला पाठवलेल्या ईमेलमध्ये न्यायालयाची इमारत बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली होती.

# तामिळनाडूत द्रमुकचे सरकार पुन्हा सत्तेवर येईल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि द्रमुकचे अध्यक्ष एम. के. स्टॅलिन यांनी विधानसभेत विश्वास व्यक्त केला की पुढील दोन महिन्यांत राज्यात द्रमुकचे सरकार पुन्हा स्थापन होईल. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हा दावा केला.

विधानसभेतील समारोपाच्या भाषणात स्टॅलिन म्हणाले, तामिळनाडूच्या जनतेप्रमाणेच मलाही विश्वास आहे की पुढील २ महिन्यांत द्रमुक पुन्हा सत्तेत येईल. पुनरागमनानंतर विकास उपक्रम अधिक वेगाने राबवले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. द्रविडियन मॉडेल २.० सरकार हे आमच्या आतापर्यंतच्या कामगिरीपेक्षा अधिक प्रभावी असेल, असे सांगत त्यांनी आपल्या सरकारच्या कार्याचा आढावा घेतला. राज्यातील जनतेने सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी आभार मानले.

स्टॅलिन यांनी आपल्या भाषणात तामिळनाडूच्या द्रविड चळवळीच्या नेत्यांचा उल्लेख केला. ई. व्ही. रामास्वामी, सी. एन. अण्णादुराई आणि एम. करुणानिधी यांच्या मार्गावर द्रविड मॉडेल सरकार उभारल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.

"माझ्यावर सोपवलेली जबाबदारी मी सक्षमपणे पार पाडली आहे, असे मला वाटते. तामिळनाडूला आणखी समृद्ध करण्याची क्षमता आपल्या सरकारकडे आहे," असे ते म्हणाले.

### सुरक्षेच्या कारणास्तव बंद ठेवलेली स्थळे मे पर्यंत टप्प्याटप्प्यात सुरू

# जम्मू-काश्मीरमध्ये ९ नवी पर्यटन स्थळे उघडणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर :** पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षेच्या कारणास्तव बंद ठेवण्यात आलेली जम्मू-काश्मीरमधील सर्व पर्यटन स्थळे मे महिन्यापर्यंत टप्प्याटप्प्याने पुन्हा सुरू केली जातील, तसेच केंद्रशासित प्रदेशात ९ नवीन पर्यटन स्थळे विकसित करून उघडण्यात येतील, अशी घोषणा मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी केली.

आपल्या अखत्यारीतील विभागांच्या अनुदान मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी पर्यटन क्षेत्राला राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याचे नमूद केले. "गेल्या वर्षीच्या पहलगाम दहशतवादी



हल्ल्यानंतर पर्यटनाला मोठा फटका बसला. या क्षेत्राला उभारी देण्यासाठी सरकारने व्यापक प्रयत्न केले," असे ते म्हणाले.

२२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाममधील बैसरन मेडोज येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २५ पर्यटक आणि एका स्थानिक पोनीवाल्याचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर सुरक्षा तपासणीच्या पार्श्वभूमीवर जम्मू-काश्मीरमधील ६० हून अधिक पर्यटन स्थळे तात्पुरती बंद करण्यात आली होती.

हल्ल्यानंतर पर्यटन आकडेवारीत मोठी घसरण नोंदवली गेली. २०२४ मध्ये काश्मीर खोऱ्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या ३४.९८ लाखांवरून २०२५ मध्ये ११.१६ लाखांवर आली. जम्मू विभागातही २०२४ मधील २.०१ कोटींच्या तुलनेत २०२५ मध्ये १.६२ लाखांपर्यंत घट झाल्याचे अधिकृत आकडे दर्शवतात.

"पहलगाम हल्ल्यानंतर पुढील २ ते ३ वर्षे कोणीही जम्मू-काश्मीरकडे पर्यटनासाठी पाहणार नाही, अशी भीती उद्योग क्षेत्राला वाटत होती. मात्र आम्ही देशभरातील टूर ऑपरेटर आणि भागधारकांशी संपर्क साधत विश्वास पुनर्स्थापित करण्याचा प्रयत्न केला," असे अब्दुल्ला म्हणाले. सध्या सोनमर्ग आणि गुलमर्ग येथे हॉटेल्स पूर्ण क्षमतेने भरलेली असल्याचे त्यांनी सांगितले. श्रीनगर येथील हॉटेल्समध्ये ३० ते ४० टक्के व्याप असल्याचेही त्यांनी नमूद केले. बंद पर्यटन स्थळे पुन्हा सुरू करण्याबाबत केंद्र सरकारशी सातत्याने चर्चा सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मे महिन्यापर्यंत सर्व बंद स्थळे सुरू करण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे त्यांनी सांगितले.

उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी १४ पर्यटन स्थळे पुन्हा सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये काश्मीरमधील ११ आणि जम्मूमधील ३ स्थळांचा समावेश आहे. गेल्या वर्षी जूनमध्ये काश्मीर आणि जम्मूमधील प्रत्येकी ८ अशा एकूण १६ स्थळांना परवानगी देण्यात आली होती, तर सप्टेंबरमध्ये काश्मीरमधील ७ आणि जम्मूमधील ५ स्थळे पुन्हा खुली करण्यात आली होती.

राज्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी ९ नवीन ठिकाणे विकसित करण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. भारत सरकारच्या निधी सहाय्यित योजनेअंतर्गत ही स्थळे उभारण्यात येतील. "नवीन पर्यटन स्थळांच्या विकासात जम्मू प्रदेशालाही योग्य प्रतिनिधित्व दिले जाईल," असे अब्दुल्ला यांनी स्पष्ट केले. पर्यटन स्थळे पूर्णपणे सुरू झाल्यास आणि नव्या प्रकल्पांची अंमलबजावणी वेगाने झाल्यास, जम्मू-काश्मीरमध्ये पर्यटकांचा ओघ पुन्हा वाढेल, असा विश्वास प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.